# प्रकरण – 5 वे

## स्वा. दादासाहेब उंडाळकरांच्या

## कार्याचे मूल्यमापण

## स्वा.दादासाहेब उंडाळकरांच्या कार्याचे मूल्यमापन

दादासाहेब उंडाळकरांचा जन्म सर्वसामान्य शेतकरी कुटूंबात झाला. जन्मानंतर एक वर्षाच्या आतच मातृप्रेमाला त्यांना वंचित व्हावे लागले. त्यामुळे शिक्षण बेताचेच झाले. आई जरी मरण पावली असली तरी त्यांच्या वडिलांनी, आत्यांनी तसेच मामांनी दादांच्यावर चांगले संस्कार केले. तसेच उंडाळे गावातील विष्णू रामजी पाटील, ज्ञानू गणू पाटील यांचेही मार्गदर्शन दादांना लाभले.

वडिलांच्या इच्छेनुसार दादांना दोन विवाह करावे लागले. त्यामुळे त्यांची कौटुंबिक जबाबदारी वाढली. पण त्या अगोदरच त्यांच्या क्रियाशील जीवनाला प्रारंभ झाला होता. राजकारणाकडे तसेच स्वातंत्र्य चळवळीकडे ते ओढले जात होते. हरीभाऊ घोडके या ब्राम्हण अधिकाऱ्याची प्रेरणा त्यांना मिळाली होती. दादा लहानपणी पासूनच कर्मयोगी होते. कर्मावर त्यांची अढळ श्रध्दा होती. वेगवेगळी कामे व वेगवेगळया भूमिका बजावताना त्यांना खुप अनुभव आले. निरनिराळया विचारांचे, स्वभावाचे लोक त्यांच्या कार्यामुळे त्यांना जवळून पहाता आले.

काही माणसे प्रपंच नीटनेटका करतात तर काही माणसे लोकहिताच्या गोष्टी करण्यासाठी आयुष्य वेचतात. प्रपंच नेटका करणाऱ्यांचे जनसेवेकडे, सार्वजनिक कार्याकडे बहुदा दुर्लक्ष होते तर सार्वजनिक सेवा करणाऱ्यांचा प्रपंच फाटका रहातो. नेटका संसार करुन भरीव सार्वजनिक कार्य करणारी माणसे क्वचितच आढळतात. दादासाहेब उंडाळकर ह्या क्वचितांच्या वर्गातील एक होते. त्यांनी आपला प्रपंच नीटनेटका केलाच पण तसेच चिर स्मरणात राहील असे भरीव सार्वजनिक कार्यही केले.

दादासाहेब उंडाळकर उंडाळे परिसराचे पर्यायाने कराड तालुक्याचे भूषण समजले जात. ते त्यांनी केलेल्या कार्यामुळेच राजकारण, स्वातंत्र्य चळवळ, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण आदि सर्व क्षेत्रात त्यांनी आपला प्रभाव पाडला होता. त्यांच्या यशाचा पाया त्यांच्या धाडसी स्वभावात व तत्वनिष्ठ विचारसरणीत होता. प्रवाहपतिता प्रमाणे इतर काम करतात म्हणून आपणही तसेच काम करावे म्हणून त्यांनी कधीच कोणते कार्य केले नाही. तर स्वतःच्या बुध्दीला पटेल तेच कार्य केले व विशिष्ट ध्येय नजरेसमोर ठेऊन ते प्राप्त करण्यासाठी धाडसाने ध्येयसिध्दीचा प्रयत्न केला. दादांनी जवळ–जवळ 35 ते 40 वर्षे सार्वजनिक समाज कार्य केले. या प्रदीर्घ कालखंडात त्यांची समाजसेवेची निष्ठा अचल राहिलेली होती. ते आयुष्यभर गोर–गरीबांच्या कल्याणासाठी झटले. तोच त्यांच्या ध्येयवादाचा गाभा होता. समाजकार्य करणे हे एकटया–दुकटयाचे काम नाही त्यासाठी अनेक कार्यकर्त्यांची साथ असणे आवश्यक असते अशा प्रकारचे कार्यकर्ते त्यांनी उंडाळे परिसरात निर्माण केले.

## जीवनातील दोन मुलभूत प्रेरणा

दादासाहेब उंडाळकर यांच्या जीवनातील दोनच प्रभावी प्रेरणा त्यांचे सर्व जीवन व्यापून उरलेल्या होत्या. पहिली प्रेरणा समाजातील दीन–दुबळयाबद्दल त्यांना वाटणारी करुणा आणि दुसरी प्रेरणा म्हणजे त्यांना राजकारण व स्वातंत्र्याबद्दल वाटणारे आर्कषण.

समाजातील शेवटच्या थरातील शेवटच्या माणसाबद्दल त्यांना उपजत प्रेम होते. ग्रामीण भागातच त्यांचे आयुष्य गेल्यामुळे खेडया–पाडयातील सर्वसामान्य लोकांचे दुःख दारिद्रय त्यानी जवळून पाहिले होते. त्यामुळे कदाचित त्यांच्यामध्ये हे प्रेम

बाल्यावस्थेतच निर्माण झाले असेल. कदाचित त्यांच्या वडिलांच्याकडून मामांच्याकडून त्यांना हा गुण मिळाला असेल परंतू या एका प्रेरणेमुळेच ते आपल्या आयुष्यात दीन-दुबळयांच्या साठी कार्य करु शकले असे आढळते.

या करुणे बरोबरच दादांना राजकारणाचे व स्वातंत्र्य चळवळीचेही आकर्षण होते. त्या काळातील स्वातंत्र्य चळवळीचे थोर नेते म.गांधी, पंडित नेहरु, सरदार पटेल, डॉ.राजेंद्र प्रसाद या सारख्या राष्ट्रीय नेत्यांचा प्रभाव देशातील सर्व थरातील जनतेवर पडलेला दिसून येतो. त्यांच्या विचारातून स्फूर्ती घेऊन खेडया-पाडयातील सर्व सामान्य कुटूंबातील लोक स्वातंत्र्य आंदोलनात नव्या जोमाने उतरत होते. त्या मालिकेतीलच दादा उंडाळकर हे होत. 1928 साला पासून दादा राजकारणाकडे ओढले गेले. दोन वेळा त्यानी जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून काम पाहिले. यावेळी हाती आलेली सत्ता लोककल्याणासाठी कशी राबवयाची याचा आदर्श त्यानी कॉंग्रेसमधील कार्यकर्त्यांना घालून दिला. याबरोबरच स्वातंत्र्य चळवळीचे आकर्षण दादांना होते. सातारा जिल्ह्यात नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्याची प्रतिसरकारची चळवळ जोमाने फोफावत होती. त्यावेळी दादानी गांधीजींच्या सत्य-अहिंसा या मार्गाने जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. स्वातंत्र्य लढयात प्रवेश केल्यानंतर त्यानी आपल्या संसाराचा अगर शेतीवाडीचा कधी विचार केला नाही. अगदी तन-मन-धनाने त्यानी स्वातंत्र्य चळवळीत स्वतःला झोकून दिले.

## कुशल संघटक

सातारा जिल्ह्यामध्ये नाना पाटील यशवंतराव चव्हाण यांच्या सारख्या नेत्यानी स्वातंत्र्य आंदोलनाला गती दिली. हे नेते कुशल संघटक होते. त्याच्याप्रमाणे दादाही कुशल संघटक होते हे त्यानी लढविलेल्या जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणूकीत आणि 24 ऑगस्ट 1942 रोजी कराड मामलेदार कचेरीवर काढलेल्या मोर्चावरुन दिसून येते. जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणूकीत आर्थिक पाठबळ, राजकीय पाठबल यापैकी काहीच पाठीशी नसताना केवळ आपल्या संघटन कौशल्याच्या जोरावर दादांनी मतदारांना आपल्या बाजूकडे वळविले व या निवडणूकीत यश संपादन केले. तसेच कराड मामलेदार कचेरीवरील मोर्च्यासाठी हजारो लोक जमा करणे व अहिंसात्मक मार्गाने मोर्चा यशस्वी करणे या गोष्टी दादांच्या कुशल संघटन कौशल्यामुळेच शक्य झाल्या असे म्हणता येईल. तसेच कराड तालुक्यातील उंडाळे गावी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते काकासाहेब गाडगीळ यांची झालेली सभा दादांच्यामुळेच यशस्वी झाली. त्याचप्रमाणे 1937 च्या मुंबई विधानसभेच्या निवडणूकीत दादानी कै. शंकरराव मोहिते या सुशिक्षित व निस्वार्थी तरुणाला पाठिंबा देऊन निवडून आणले.

वरील उदाहरणांच्या वरुन दादांच्यातील कुशल संघटकाच्या गुण सहज दिसून येतो. या गुणा मुळेच ते कॉंग्रेसचा विचार कराड तालुक्यातील प्रत्येक गावातील घरोघरी पोहचविण्यासाठी प्रयत्न करु शकले.

## निर्भय सत्याग्रही

स्वातंत्र्य चळवळीत अहिंसा सत्याग्रहाचा मंत्र म.गांधीनी भारतीयांना दिला. या मंत्राने भारतीय जनता भारुन गेली. व स्वातंत्र्य चळवळीला मोठी गती मिळाली. सत्याग्रहाचे शस्त्र गांधीजीनी भारतात प्रथम चंपारण्यामध्ये वापरुन तेथील शेतकऱ्याना न्याय मिळवून दिला. त्यानंतर त्यानी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या प्रत्येक चळवळीत सत्याग्रहाचा वापर केला. गांधीजीनी स्वातंत्र्य चळवळीत कार्य करणारे हजारो सत्याग्रही निर्माण केले. व देशाला स्वातंत्र्याच्या जवळ नेले.

गांधीजीच्या विचाराचा प्रभाव खेडया-पाडयातील हजारो तरुणांच्यावर पडलेला होता. त्यातीलच दादासाहेब उंडाळकर हे एक होत. खरा सत्याग्रही निर्भय असतो. दादांच्यातील या गुणाचा प्रत्यय 24 ऑगस्ट 1942 च्या कराड मामलेदार कचेरी वरील मोर्चाच्या वेळी दिसून येतो. या मोर्चाच्या कराड तालुक्यातील हजारो शेतकरी सामील झाले होते. या मोर्चाचे नेतृत्व दादांच्या कडे होते. त्या काळात शातंतामय मार्गाने निघणाऱ्या मोर्चाचे नेतृत्व करणे हे फारच आव्हानात्मक कार्य होते. कारण त्या काळात मोर्चावर पोलिसाकडून गोळीबार होण्याची शक्यताही नाकारली जात नव्हती. किंवा मोर्चातील लोकांच्याकडून ही हिंसाचार होण्याचीही शक्यता असे. व त्यामध्ये निष्पाप लोकांना प्राण गमवावा लागत असे. परंतू दादानी या प्रचंड मोर्चाचे नेतृत्व तितक्याच असामान्य धैर्याने केले आणि हा मोर्चा यशस्वी केला. हा प्रसंग महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य लढयाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहून ठेवण्या इतका मोलाचा आहे. सातारा जिल्ह्यातील इतर ठिकाणी निघालेल्या मोर्चांना मात्र हिंसाचाराचे गालबोट लागले.

## कार्यकर्ते निर्माण करणारा नेता

आपल्या देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात विशेषतः 1935 नंतर अनेकविध प्रवृत्तीचे आणि प्रकृतीचे कार्यकर्ते निर्माण झाल्याचे दिसतात. काहींही मिळण्याची हमी नसलेला पण सर्वस्व गमवावे लागेल अशी तयरी ठेवण्याचा इशारा देणारा तो काळ होता. त्यामुळे भावनेने व विचाराने आकर्षित झालेली मंडळीच कार्यकर्ते म्हणून पुढे येत होती. ब्रिटीश साम्राज्य सत्ता घालवायची व आपले स्वातंत्र्य प्रस्थापित करायचे म्हणजे नेमके काय करायचे याच सर्व तपशिलाची जाण या सर्व कार्यकर्त्यांना नव्हती. तरी त्याची स्थूल कल्पना व सुत्रे मनावर बिंबलेली होती. 1357 चे पहिले स्वातंत्र्य युध्द, राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना वासुदेव बळवंत फडके, उमाजी नाईक याची बंडे, बंगालच्या फाळणी विरुध्दचे आंदोलन, 1920, 1930-32 असे वाढत्या लोकसहभागाचे व लोकसामर्थ्याचे दर्शन घडविणारे लढे आणि त्याच जोडीला स्वातंत्र्य आंदोलनाचे सातत्य टिकवून धरणारे महात्मा गांधीचे लढाऊ व विधायक नेतृत्व, जवाहरलाल नेहरु, सुभाषचंद्र बोस, जयप्रकाश नारायण यासारख्या नव्या तरुण नेत्यांचे समाजवादी भारताच्या रचनेचे आवाहन, सातारा जिल्ह्यातील नाना पाटलांचे प्रतिसरकार आणि 1942 च्या "चलेजाव" या अंतिम लढयाची हाक या सारख्या घटनांची मालिका व व्यक्तिमत्वाचे प्रभाव यानी भारावून गेलेल्या वातावरणात भारताच्या स्वातंत्र्याची प्रेरणा व स्वतंत्र भारताची प्रतिमा या कार्यकर्त्यांच्या विचार आचारावर प्रभाव टाकत होती. या प्रेरणांच्या आणि प्रतिमांच्या शिदोरीवर प्रत्यक्ष स्वातंत्र्यकाळात ज्यांनी कार्यक्षमता विकसित केली व कार्यकक्षा रुंदावत नेली अशा कार्यकर्त्यांपैकी दादा हे सातारा जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्ते होते. कार्यकर्ते निर्माण करण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न करणारा नेता हे पद दादानी याच

शिदोरीच्या आधारावर मिळविले. दादांच्या कडून स्फुर्ती घेवून अनेक कार्यकर्ते उंडाळे परिसरात सार्वजनिक जीवनात कार्य करु लागले. त्यामध्ये श्री.मारुतीराव शेवाळे–घोगाव, कै.महादू पाटील–टाळगाव, श्री.हसनभाई –म्हासोली, वसंतराव जिंतीकर, श्री.बापराव पाटील–शिरंबे, दादांचे चिरंजीव कै.शामराव पाटील जयसिंगराव पाटील, विलासराव पाटील यांचा समावेश करता येईल.

## दलीतांचे कैवारी

महाराष्ट्रात अस्पृश्योद्धाराचे कार्य महात्मा जोतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, . कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या थोर समाजसुधारकापासून प्रेरणा घेऊन प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक तालुक्यात व गावात समाज सुधारणेचे कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांची परंपरा निर्माण झाली. या कार्यकर्त्यांनी आपल्या गावांत, तालुक्यात आपल्या कुवतीप्रमाणे समाज सुधारणेचे कार्य करण्याचा प्रयत्न केला. या कार्यकर्त्यांच्या मालिकेत दादाना महत्वाचे स्थान आहे. त्या काळात गांधीजीनी अस्पृश्योद्धाराच्या कार्याला महत्वाचे स्थान दिले होते. त्याचाही दादांच्यावर प्रभाव होता.

कराड तालुक्यात उंडाळे परिसरातील दलीत बांधवाना दादांचा फार मोठा आधार वाटत असे. गावातील सवर्ण–दलीत संघर्षाच्या प्रसंगी अनेक वेळा ते दलीतांच्या पाठीशी उभे राहिल्याचे दिसून येते. उदा.1956 नंतर उंडाळे परिसरातील घोगाव गावातील दलीत समाजाने बौध्द धर्माची दिक्षा घेतली. त्यावेळी गावातील सवर्ण मंडळीनी या नव बौध्द समाजावर बहिष्कार टाकला. यावेळी दादांनी दलितांची बाजू घेऊन सवर्ण मंडळीना चांगलेच खडसावले व बहिष्कार मागे घेण्यात त्यांना भाग

पाडले.

तसेच अडी-अडचणीच्या प्रसंगी दादांनी दलीतांना धान्य व पैशाच्या रुपाने अनेक वेळा मदत केलेली दिसून येते. त्यांच्या मनात दलितांच्या बद्दल प्रेम होते. समाजात दलितांना जी वाईट वागणूक मिळे तसेच त्यांचे दारिद्रय, अज्ञान यामुळे दादांच्या मनात त्याच्याबद्दल कणव निर्माण झाली होती. दादानी आपल्या घरात एक अस्पृश्य नोकर ठेवून घरातूनच अस्पृश्यतेला मूठमाती दिली. त्याचप्रमाणे अनेक वेळा स्वर्ण-दलित यांना एकत्र आणून सामुदायिक सहभोजनाचा सोहळा घडवून आणला व त्याद्वारे गावातील अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. असे जरी असले तरी दादांना या कार्यात पुर्णपणे यश आले असे म्हणता येणार नाही. थोड्याफार प्रमाणात आजही प्रत्येक गावात अस्पृश्यता टिकून असल्याचे दिसून येते.

मात्र एक गोष्ट घेतली पाहिजे ती म्हणजे त्या काळात दलितांचा स्पर्श किंवा सावली पडली तरी पाप समजले जात होते. दलितांना पशूहून हिन वागणूक मिळत होते. अशा काळात उंडाळे गावातील व परिसरातील अस्पृश्यता नष्ट करण्याची दादांची धडपड व दलितांविषयी त्यांना वाटणारी कणव निश्चितच कौतूकास्पद आहे, असे म्हणता येईल.

## शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही याची जाणीव

19 व्या शतकात महाराष्ट्रातील बहुसंख्य जनता अज्ञान व दारिद्र्यात खितपत पडली होती. कारण या बहुसंख्य समाजाला शिक्षण मिळाले नव्हते. शिक्षणाशिवाय बहुजन समाजाची स्थिती सुधारणार नाही हे प्रथम महात्मा फुले यांनी ओळखले. त्यासाठी त्यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. त्याच्यानंतर विठ्ठल रामजी शिंदे, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील

यांनी या क्षेत्रात मोलाची कामगिरी केली आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून गंगोत्री खेड्यापाड्यातील वाडी–वस्तींवर पोहोचविण्याचा प्रयत्न केला. कर्मवीर आण्णांच्यापासून प्रेरणा घेऊन डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेनेही शिक्षण प्रसाराचे फार मोठे कार्य केले आहे. हेच कार्य विदर्भात श्री. शिवाजी शिक्षण संस्थेने केले. या शैक्षणिक संस्थांचा वारसा घेऊन अनेक शिक्षण प्रेमी मंडळींनी गावोगावी शिक्षण संस्था स्थापन करून शिक्षण प्रसाराचे कार्य केले आहे. सातारा जिल्ह्यात तर अशा शिक्षण संस्थांनी जाळेच विणले आहे.

दादांनी आपल्या कुवतीप्रमाणे शिक्षण क्षेत्रात कार्य केले आहे. आपल्या उंडाळे परिसराचा सर्वांगिण विकास शिक्षणाशिवाय घडणार नाही, असे दादांचे ठाम मत होते. म्हणूनच उंडाळे गांवात त्यांनी हायस्कूल काढण्यासाठी प्रयत्न केले. या हायस्कूलमुळे ग्रामीण भागातील गरिब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे शक्य झाले. आज या हायस्कूल शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी सरकार दरबारी मोठ्या अधिकार पदावर काम करीत असल्याचे दिसून येतात. त्याचे सर्व श्रेय दादांना आहे, असे म्हणता येईल. तसेच दादांनी उंडाळे परिसरातील अनेक गरिब व हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अर्थिक मतदही केली. त्यांच्या मदतीमुळे अनेकांना उच्च शिक्षण घेता येणे शक्य झाले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही अशी दादांची धारणा होती.

दादांचे शैक्षणिक तत्वज्ञान कर्मवीर आण्णांच्या शैक्षणिक तत्वज्ञानावर आधारलेले होते. कर्मवीर आण्णांनी "कमवा आणि शिका" हा मंत्र बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना दिला. त्याचप्रमाणे दादा "घाम गाळा अन् शिका शाळा" असे म्हणत असत. श्रमाची प्रतिष्ठा विद्यार्थ्यांना समजली पाहिजे. असे त्यांचे मत होते. म्हणून

सरकारने सुरु केलेल्या फी सवलतीच्या धोरणाला त्याचा विरोध होता. फी माफीमूळे विदयार्थ्याच्यात चैन ऐषाराम इ.दुर्गण वाढीत लागतील असे त्यांना वाटत होते. विदयार्थी चारित्र्य संपन्न बनण्यासाठी तसेच समाजातील भेद–भाव नष्ट होण्यासाठी वसतीगृह युक्त शिक्षण संस्था असाव्यात असे त्यांचे मत होते. त्या दृष्टीने त्यानी उंडाळयात वसतीगृह युक्त हायस्कूल काढले.

असे जरी असले तरी दादाना शिक्षण क्षेत्रात फारसे कार्य करणे शक्य झाले नाही. कारण तो काळ स्वातंत्र्य चळवळीचा होता. दादा तिकडे आकर्षित झाल्यामुळे अनेक शाळा काढणे त्यांना शक्य झाले नाही असे म्हणता येईल.

## गोरगरिबांविषयी कणव

दादांनी अनेक गोर–गरीब शेतकरी कुटूंबातील मुलांना शिक्षणासाठी सढळ हाताने मदत केली. अनेक मुलांना नोकरी–धंदयात लावले आहे. दारिद्रयात उपाशी–पोटी रहाणाऱ्या गावकऱ्याला धान्यरुपाने, पैशाच्या रुपाने मदत करण्यास मागे–पुढे पाहिले नाही. राजकीय तडफ असलेला तरुण दिसला तर त्याला प्रोत्साहन दिले. पक्षीय विचार न करता अशा कार्यकर्त्यांच्या अडचणी स्वतः आर्थिक झळ सोसून दुर केल्या. त्यांच्या फाटक्या संसाराला हातभार लावला. दलीतांच्या शेतमजूरांच्या अडी–अडचणी निवारण केल्या. गरजू शेतकऱ्यांना शेती औजारे, बी–बियाणे, बैल जोडी देऊन त्यांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न दादांनी केला. थोडक्यात जिथं–जिथं माणूस तुंबला तिथं दादांनी मूकपणे त्याचा तुंब निखळून काढला असे म्हणता येईल. दादांनी गोर–गरीबांच्यासाठी, दलीतांच्यासाठी आनंदाने पदरचे पैसे खर्च केले. त्यांनी घेण्यापेक्षा देण्यातील आनंद मोठा मानला. भोगापेक्षा त्यागाचा आनंद

उपभोगला. अडचण आली असता ज्याच्या घरापुढे हक्काने उभे राहता येईल असा दिलासा गोरगरिबांच्या ठायी त्यांनी निर्माण केला. म्हणूनच त्यांच्या शब्दाला वजन होते, मान होता, असे म्हणता येईल.

## समाज सुधारणेच्या कार्याला घरापासून प्रारंभ

19 व्या शतक हे महाराष्ट्रात समाज सुधारणेचे शतक ठरले. समाजातील अज्ञान, रूढी परंपरा, अंधश्रद्धा, जातीयता, अज्ञान याविरूद्ध समाज सुधारकांनी रणशिंग फुंकले. त्यात म. जोतिबा फुले, आगरकर, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापासून प्रेरणा घेऊन दादांनी उंडाळे परिसरात समाज सुधारणेचे कार्याला वाहून घेतले. समाज सुधारणेच्या कार्याबाबत दादा हे नुसतेच वाचावीर नव्हते तर ते कृतिवीर होते. समाज सुधारणेच्या प्रत्येक बाबतीत त्यांनी आपल्या घरापासूनच प्रारंभ केलेला दिसून येतो. अस्पृश्यता उद्धाराच्या बाबतीत 1930 मध्येच दादांनी आपल्या घरात एक अस्पृश्य नोकर ठेवला होता. व त्याला आपल्या कुटूंबीयाप्रमाणे वागणूक देऊन एक वेगळा आदर्श निर्माण केला. तसेच हुंडा बंदी चळवळीबाबत दादांनी आपल्या मुलांची लग्ने हुंडा न घेता, अत्यंत साधेपणाने पार पाडली आणि समाजापुढे एक नवीन आदर्श ठेवला. सामाजिक सुधारणांना स्वतःपासून सुरूवात करून दादा आपण महात्मा फुल्यांचे, राजर्षि शाहू महाराजांचे सच्चे अनुयायी आहोत हे दाखवून दिले.

## उपसंहार

दादांच्या जीवन चरित्राचा व कार्याचा अभ्यास करताना असे आढळते की, स्वातंत्र्य चळवळीत राजकारणात आणि सामाजिक कार्यात निरपेक्ष भावनेने स्वतःला झोकून देऊन त्यांनी समाजापुढे एक वेगळाच आदर्श निर्माण केला.

दादांचे गांधीजींच्या सत्य–अहिंसा या तत्वज्ञानावर श्रद्धा होती. आणि त्याच मार्गाने त्यांनी कराड तालुक्यातील स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. काँग्रेस शिवाय देशाला तरणोपाय नाही, असे दादांचे ठाम समजूत होती, म्हणूनच त्यांनी काँग्रेसचा विचार खेडो–पाड्यातील घरोघरी पोहोचविण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्य पुर्व काळात दादांनी लोकसेवेचा वसा घेऊन राजकारणात भाग घेतला व जिल्हा लोकल बोर्डाच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कामे केली व सत्ता ही लोककल्याणासाठीच राबविली पाहिजे हा आदर्श त्यांनी राजकिय कार्यकर्त्यांच्या पुढे ठेवला.

स्वातंत्र्य चळवळीतील अनेक काँग्रेस कार्यकर्ते स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणात सक्रिय झाले त्यांनी सत्तेतील अनेक महत्वाची पदे भुषविली, परंतू दादा मात्र स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेच्या साठमारीत सामील न होता राजकारणापासून ते अलिप्त राहीले. व राजकिय कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याची भुमिका त्यांनी स्विकारली हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वेगळे वैशिष्ट्य मानावे लागेल. थोडक्यात दादांची स्वातंत्र्य चळवळीतील व राजकारणातील भुमिका लक्षात घेतली तर असे म्हणता येईल की, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, राजाराम बापू पाटील, किसन वीर या नेत्यांप्रमाणे कार्य करणे दादांना शक्य झाले नसले तरी म. गांधी यांच्या स्वातंत्र्य लढ्याकडे आकृष्ट झालेल्या सातारा जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील पहिल्या

पिढीचा एक स्वातंत्र्य सेनानी व राजकारणी म्हणून त्यांचे स्थान विशेष महत्वाचे वाटते.

दादांनी सामाजिक कार्यातही आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. महाराष्ट्रात सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे अनेक कर्ते समाज सुधारक होऊन गेले. म. फुले हे आध्य समाज सुधारक मानता येतील. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन प्रत्येक तालुके खेड्यापर्यंत कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांची मालीका महाराष्ट्रात निर्माण झाली. त्या मालीकेतील दादा एक प्रमुख होते. दादांनी अस्पृश्यता निर्मूलन, हुंडाबंदी, शिक्षण प्रसार या क्षेत्रात प्रभावी कार्य केले आहे. त्यांनी म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षि शाहू महाराज, संत गाडगे बाबा, कर्मवीर आण्णा यांचा वारसा पुढे चालविणेचा प्रयत्न केला. परंतू, या सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात दादांना फार मोठे भरीव कार्य करता आले किंवा या कार्यात त्यांना फार मोठे यश मिळाले असे म्हणता येणार नाही. मात्र ज्या काळात समाज रूढी परंपरेमध्ये गुरफटलेला होता, त्या काळात समाजातील प्रस्तापित परंपरेला विरोध करणे हे फार धाडसाचे काम होते आणि हे धाडस दादांनी दाखविले.

थोडक्यात दादांनी स्वातंत्र्य चळवळीत राजकारणात आणि सामाजिक क्षेत्रात जे कार्य केले ते त्यावेळची उंडाळे परिसराची पार्श्वभूमी लक्षात घेता अतिशय मोलाचे आहे असे निश्चितपणे म्हणता येईल.

## संदर्भ ग्रंथ सूची

**1) संदर्भ ग्रंथ** –


1) गॅझेटियर सातारा

2) सामान्य भूगोल – सातारा जिल्हा

3) माटे गो.रा.

असा घडला सातारा जिल्हा

4) डॉ.शिंदे आबासाहेब

साताराचे प्रतिसरकार – प्रसंग आणि व्यक्ती

5) गोखले बाबुराव

जागृत सातारा

6) चव्हाण यशवंतराव

"कृष्णा काठ"

7) पाटणे संभाजीराव

"स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा"

8) प्रा.पाटील प्रकाश

"समाज प्रबोधनाची आव्हाने"

9) देशमुख पंजाबराव

कर्मवीर भाऊराव पाटील


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

10) बॅ.पाटील पी.जी

"कर्मवीरोपनिषद"

11) धन्वंतरी कासेगावकर वैदय

सातारचे प्रतिसरकार – स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती

12) डॉ.पवार जयसिंगराव

हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास

13) डॉ.दास्ताने संतोष

"महाराष्ट्र 1993"

14) लाड हरीभाऊ

"माझ्या राजकीय आठवणी"

15) गायकवाड, थोरात, पाटील, भिडे

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास

16) पाटील रा.तु.

सांगली – सातार्‍याचे राजकारण

17) थोरात संभाजी बाबा

यशवंतराव चव्हाण झुंजार नेतृत्वाचा शोध आणि बोध

18) पाटील रा.तु.

यशवंतराव चव्हाण एक कर्तबगार पण

वादग्रस्त मुसद्दी

2) <u>**गौरव – लेख**</u>

1. डॉ.मंगुडकर मा.प.

**ध्येयवादी स्वातंत्र्य सेनानी – दादा उंडाळकर**

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे

2. आळतेकर ग.स.

**एक निष्ठावान तळमळीचा कार्यकर्ता**

**संपादक – विठ्ठल पाटील, कन्हैया कुंदप**

**क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे**

3. **थोरात संभाजीराव, दुरदृष्टीचा राष्ट्रवादी**

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ. कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे

4. **बॅ.पाटील पी.जी., ओजस्वी–साक्षेपी क्रांतीकारक**

**संपादक – विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप**

**क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे**

5. पाटील दिनकरराव बाळकृष्ण, कल्पवृक्ष आम्हासाठी लावूनिया दादा गेले !

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे

6. **गोखले पुरषोत्तम पांडुरंग**

**"माणसं शहाणी होवाया हवीत"**

**संपादक – विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप**

7. चव्हाण यशवंतराव, देशभक्त दादा उंडाळकर

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे

8. **कुलकर्णी अंजली, थोर स्वातंत्र्य सेनानी व**

**समाजसेवक दादा उंडाळकर**

**स्मृती ज्योत** दादा उंडाळकर **स्मरणिका** – 1994

९. **प्राचार्य थोरात** प.ता.

असामान्यत्वाचा अविष्कार – दादा उंडाळकर

स्मृती ज्योत दादा उंडाळकर स्मरणिका – 1994

10. **माने वाय्.डी., दीन–दुबळयांचे कैवारी – दादा**

**स्वा.दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976**

11. ढेरे तुकाराम ज्योती, अस्पृश्योद्धारक दादा

स्वा.दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

12. कुलकर्णी अनंतराव, देशप्रेमी समाजसेवक

स्वा.दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका –1976

13. डॉ.भोसले द.ता.

एक स्वप्नवेडा दृष्टा पुरुष

स्वा.दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

3) **वृतपत्रे**

1. दैनिक "ऐक्य" सातारा
2. दैनिक "केसरी" पुणे
3. दैनिक "सकाळ" पुणे
4. दैनिक "कृष्णा एक्सप्रेस" कराड
5. दैनिक "ग्रामोध्दार" सातारा

4) **मुलाखती**

1. पाटील जयसिंगराव बाळकृष्ण

   स्वा.दादांचे चिरंजीव ठिकाण – उंडाळे

   दि. 21.4.1994

2. पाटील बापूराव बळवंत

   निवृत्त प्राथमिक शिक्षक, स्वा.दादांचे स्नेही

   ठिकाण – उंडाळे

   दि.21.4.1994

3. पाटील विठ्ठल

निवृत्त ग्रंथपाल कराड नगरपालिका वाचनालय,

स्वा.दादांचे स्नेही, ठिकाण – कराउ

दि. 18.4.1994

4. नावलीकर सदाशिव गोपाळ

स्वातंत्र्य सैनिक, निवृत्त प्राथमिक शिक्षक

ठिकाण – कराड

दि. 30.4.1994 – 20.5.1994

5. माने व्यंकटराव, स्वातंत्र्य सैनिक

ठिकाण – उंब्रज


दि. 22.5.1994


6. प्राचार्य थोरात प.ता.

अध्यक्ष स्वा.दादा उंडाळकर स्मारक समिती

ठिकाण – कराड

दि. 26.5.1994


सातारा जिल्हा
प्रमुख रस्ते व लोहमार्ग
० ३०
किलोमीटर
उ
पुण्याकडे
शिरवळ
पुण्याकडे
बारामतीकडे
खंडाळा
लोणंद
साखरवाडी
फलटण
महाडकडे
धोम
वाई
सुरुर
पाचगणी
महाबळेश्वर
आदर्की
वाठार
पाचवड
पंढरपूर-सोलापूरकडे
शिंगणापूर
केळघर
मेढे
जरंडेश्वर
पंढरपूर सोलापूरकडे
कोरेगाव
पुसेगाव
दहिवडी
म्हसवड
सातारा
सातारा रे.स्टे.
खटाव
सज्जनगड
रहिमतपूर
वडूज
पंढरपूर सोलापूरकडे
औध
पाल
पुसेसावळी
कलेढोण
रत्नागिरीकडे
मायणी
पाटण
हेळवाक
मसूर
उंब्रज
मल्हारपेठ
कराड
सांगलीकडे
ढेबेवाडी
शेणोली
मिरज-बंगलूरकडे
तासगाव-सांगलीकडे
सांगलीकडे
बंगलूरकडे
सूची
राष्ट्रीय महामार्ग
प्रमुख रस्ते
लोहमार्ग
जिल्हा मुख ठिकाण
तालुका मुख्य ठिकाण
गांव



सातारा जिल्हा प्राकृतिक
येसाजी कंक तलाव (भाटघर)
नीरा नदी
खंडाळा
वाई
फलटण
नीरा नदी
पार घाट
प्रतापगड
हातलोट घाट
सातारा
कोरेगाव
दहीवडी
पिंगळी तलाव
वडूज
(खटाव तालुका)
येरळा नदी
मायणी तलाव
ऊ. तिवरा घाट
कुंभार्ली घाट
भैरवगड
कराड
कोयना नदी
वांग नदी
कृष्णा नदी
0 10 20 30
किलोमीटर
उत्तर
उंची मीटरमध्ये
९०० ते १२०० व अधिक
६०० ते ९००
४५० ते ६००
सूची
जिल्हा सीमा
तालुका सीमा
जिल्हा मुख्य ठिकाण
तालुका मुख्य ठिकाण
किल्ला,
घाट,
शिखर
टेकडी/डोंगर